Rotary
Club of Beed Midtown
# MIRRⴽR
THE MAGIC OF ROTARY
अंक-४ | Club No. 27961 | RI Year 2024-25 | दि. ३० सप्टेंबर २०२४

## रायला प्रोजेक्टच्या माध्यमातून एक हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक, फायनान्सियल आणि इन्वारमेंटल ज्ञान देऊन रोटरीने सक्षम केले






रायला प्रोजेक्टच्या माध्यमातून बीड शहरातील संस्कृती विद्यालय, विनायक विद्यालय, जिज्ञासा करिअर ॲकॅडमी बीड, आणि यशवंत विद्यालय, बीड या शाळेतील विद्यार्थ्यांना फायनान्सियल दृष्टीकोनातून सक्षम करणे तसेच इन्वारमेंटल या विषयामध्ये जनजागृती करून पर्यावरणाचे संवर्धन करण्याच्या दृष्टीकोनातून रायला हा प्रोजेक्ट घेण्यात आला. यामध्ये जवळपास एक हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

सी.ए. रो. आदेश नहार यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक ज्ञानाचे विविध धडे दिले. शैक्षणिक जीवन जगत असताना उच्च शिक्षित होऊन स्वत: आर्थिक दृष्टया सक्षम होणे तसेच परिवाराला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे त्याच बरोबर समाजातील वंचित घटकांना केलेल्या आर्थिक पुंजीतून समाजकार्य करणे आणि देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये हातभार लावणे या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्याचबरोबर रो. बाबासाहेब कुडके, रो.अमोल तळेकर, रो. डॉ. निलेश जगदाळे, रो. इंजि. नितीन गोपन, रो. अभिजितसिंह ठाकुर सर यांनी जगभरातील पर्यावरणाविषयी बदलत्या परिस्थितीविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच रो.अनुराग जैन, रो.सर्वज्ञ जोशी यांनी मी विजेता होणार या संकल्पना विद्यार्थ्यांवर बिंबवल्या.



RI President :
Rtn. Stephanie Urichick



District Governor :
Rtn.Dr. Suresh Saboo



Assitant Governor :
Rtn. Ganesh Mule



President
Rtn.Er.Nitin Gopan



Secretary
Rtn.Dr.Nilesh Jagdale



Editor :
Rtn.Balaji Gharat

## रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनकडून नाच गं घुमा, श्रावणसरी बहारदार कार्यक्रम संपन्न!




रोटरी क्लबतर्फे महिलांसाठी विशेषत: सर्व रोटरीयन महिला आणि ॲन्ससाठी नाच गं घुमा, श्रावणसरी हा कार्यक्रम आयोजित केला गेला होता. असा हा महिलांसाठीचा कार्यक्रम आयोजित होणं हे रोटरीचं पहिलच वर्ष होतं. रोजच्या कामाच्या व्यापातून धकाधकीच्या जीवनामधून महिलांना स्वत:ला आनंद मिळावा आणि स्वत:मध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना एक संधी मिळावी, यासाठी एक मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम या कार्यक्रमाच्या माध्यमातून रोटरीने केले होते. आणि त्यासाठी अगदी महिलांनीसुद्धा चांगला सहभाग नोंदवला. या कार्यक्रमामध्ये गणेश वंदना, गीत गायन, नाच गं घुमा, खेळ, उखाणे, आणि श्रावणामध्ये साजरे होणारे सर्व सणांवर आधारित म्हणजे नागपंचमी, राखी पौर्णिमा, स्वातंत्र्यदिन, श्रीकृष्ण जन्माष्टमी या सणांवर आधारित असणारे आणि समाजात एक सकारात्मक संदेश देणाऱ्या विविध गितांचा आणि उपक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमाचे सादरीकरण सौ. उषा ढेरे, श्रीमती आशा भारती, रो.डॉ.सौ. अनिता शिंदे, रो.सौ.संगिता मनसबदार, रो.सौ.संगिता सपकाळ, रो.सौ.शैलजा ओव्हाळ, सौ.सोनिका जगदाळे, सौ.मनिषा देशमाने, सौ.वर्षा थोरात, सौ.अनिता भोसले, कु.नक्षत्रा जगदाळे यांनी विशेष परिश्रम घेतले आणि कार्यक्रम यशस्वी केला.

।। महावीराय नमः ।।
राजेश बंब यांचे
जैन पत्रा & सिमेंट डेपो
नालीदार पत्रे, कलर कोटेड पत्रे, सिमेंट पत्रे, फायबर पत्रे,
सिमेंट, सनला, स्टिल, व पाईपचे होलसेल व रिटेल विक्रेते
Cell. 9225390000
9225380000
TATA SHAKTEE
पत्र्याचा कारखाना
TATA पत्र्याचे शो-रुम
: पत्ता :
सावतामाळी चौक, मोंढा रोड, बीड - ४३१ १२२

# अकिरा मियावाकी या जपानी शास्त्रज्ञ संशोधकाने संशोधन केल्यापद्धतीने रोटरी क्लबने ५५० वृक्ष लावून मियावाकी जंगल निर्माण केले.



२० चौ.फुट मियावाकी वनीकरणासाठी जागेची आखणी करण्यात आली.




१ मीटर बाय १ मीटर या अंतरावर ३ वृक्ष लागवडीसाठी आखणी करत असताना रोटरीयन




मियावाकी वनीकरण प्रोजेक्टला डिस्ट्रीक्ट गव्हर्नर रो.डॉ. सुरेशजी साबु यांनी प्रत्यक्ष भेट दिली व मियावाकी प्रोजेक्टचे कौतुक केले. तसेच मियावाकी प्रोजेक्टला संरक्षण असल्यामुळे हा प्रोजेक्ट १००% यशस्वी होणार असा विश्वास व्यक्त केला.

शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, बीड या ठिकाणी रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनने मियावाकी वनीकरण हा प्रोजेक्ट राबवण्यात आला. या मध्ये ५५० वृक्षाची लागवड करण्यात आली. यामध्ये वृक्ष, उपवृक्ष, झुडूपवर्गीय, छतवर्गीय यामध्ये वड, पिंपळ, आंबा, बेहडा, अर्जुन, मोघणी, निम, कदंब, पळस, काटेसावर, बोर, बेल, करंज, पळस, शिसम, करवंद, शतावरी, जास्वंद, कन्हेर, बेल, लिंबू, मधुमलती, रामफळ हिरडा, शेवगा, कवट, कोकम, खैर, अडुळसा इत्यादी वृक्ष लावण्यात आले. जापानी शास्त्रज्ञ अकिरा मियावाकी यांनी संशोधीत केलेल्या पद्धतीनुसार खालील प्रमाणे लागवड करण्यात आली.

जमीन पूर्णपणे भुसभुशीत करण्यासाठी नांगरणी करून लागवडीसाठी उपयुक्त क्षेत्र तयार करण्यात आले. त्या ठिकाणी जमीन सपाट केल्यानंतर १ बाय १ मीटर चौरस आकाराचे वन विभागाची लाकडी फ्रेम व साहित्य वापरून अकीरा मियावाकी या जापानी शास्त्रज्ञाने संशोधीत केल्याप्रमाणे आखणी करण्यात आली. या आखणीमध्ये वनस्पतींच्या वर्गीकरण आणि लागवडीसाठी आवश्यक १ चौ.मीटर मध्ये ३ वनस्पती त्याचे टक्केवारीनुसार नियोजन करण्यात आले. त्यामध्ये विविध रंगाच्या रांगोळीच्या खुणा त्रिकोणाच्या कोपऱ्यावर करून लाल रंग झुडूपवर्गीय हिरवा रंग उपवृक्ष, निळा रंग वृक्ष, पिवळ्या रांगोळी रंगाच्या ठिकाणी छतवृक्ष लावण्यात आले. तंत्रनिकेतन महाविद्यालयातर्फे पुढील संगोपनासाठी पाण्याचे नियोजन ठिबक किंवा तुषार पद्धतीने पाणी व्यवस्थापन करण्यात येणार आहे. लागवड केल्यानंतर जमीनीवर आच्छादन करून पाण्याचे बाष्पीभवन रोखणे आणि ओलावा टिकून राहण्यासाठी या आच्छादनांचा वापर करण्यात आला. यामध्ये गव्हाचा भुसा, भुईमुगाच्या शेगाची टरफले व बाजरीचे सरमाड चारा इत्यादी साहित्य आच्छादनासाठी वापरण्यात आले. सदरील पद्धतीने लागवड केल्यामुळे पुढील १ वर्षात झाडांची उंची १० ते १५ फुट वाढते आणि ते जंगल पारंपारिक पद्धतीने निर्माण करण्यासाठी २० वर्ष लागतात. तेथे हे जंगल फक्त २ वर्षामध्ये या पद्धतीने आपण निर्माण करू शकतो असे अकीरा मियावाकी या जापानी शास्त्रज्ञाच्या पद्धतीमध्ये सांगण्यात आले.



हा प्रोजेक्ट यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे प्रा. एम.आर. लोहोकरे सर यांनी हा प्रोजेक्ट यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. तसेच प्रोजेक्ट चेअरमन रो.डॉ. प्रकाश कोंका, रो. बाबासाहेब कुडके यांनी हा प्रोजेक्ट होण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. तसेच या प्रोजेक्टमध्ये अध्यक्ष रो.नितीन गोपन, सचिव रो. निलेश जगदाळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच हा प्रोजेक्ट यशस्वी करण्यासाठी रो. अमोल तळेकर, रो. सुरेश बुद्धदेव, रो. उमाकांत थोरात, रो. नितीन भोसले, रो. राहुल कुलकर्णी, रो.डॉ. शिवाजी देशमाने बहुसंख्येने रोटरीयन आणि महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

स्पर्धा परीक्षा क्षेत्रातील महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्था...!
जिद्द | ज्ञान | सामर्थ्य TM
जिज्ञासा करिअर अकॅडमी, बीड
01 नागरी सेवा परीक्षा
02 राज्यसेवा परीक्षा
03 दुय्यम सेवा परीक्षा
04 गट-क सेवा परीक्षा
05 सरळसेवा परीक्षा
श्री.पारनेरकर महाराज मंदिर शेजारी, गोविंद नगर, माने कॉम्प्लेक्स ते नाट्यगृह रोड, बीड (02442) 221040, 8055221040

## जैन चातुर्मासा निमित्त ६५ अजैन रोटरीयन बांधवांनी निरंकार उपवास करून शांतता निर्माण, संघर्ष निराकरणाचा दिला संदेश!







दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जैन धर्मियांचा चातुर्मास जैन मुनी अक्षयऋषी व अन्य तीन मुनीश्रींच्या सानिध्यात सुरू होता. पर्युषण पर्वाचे औचित्य साधुन जैन बांधव धर्म साधना, उपवास, तपस्या करत आलेले आहेत. पण प्रथमच ६५ अजैन बांधवांनीदेखील जैन धर्मियांच्या नियमानुसार उपवास करत मैत्रीभाव जपला. रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनच्या २० सदस्यांनी एक दिवसाचा उपवास केला. या सदस्यांनी फक्त उकळून थंड केलेले पाणी सुर्योदयापासून ते सुर्यास्तपर्यंत पिऊन २४ तास उपवास केला. रोटरी मेंबर सी.ए. आदेश नहार यांनी ९ तर डॉ. निलेश जगदाळे यांनी ८ उपवास केले. त्यांनी केलेली तपस्या लक्षात घेता रो. जितेंद्र बोरा, रो. राहुल बोरा, रो.डॉ. शिवाजी देशमाने, रो. भारत बेद्रे, रो. नितीन भोसले, रो. संगिता कदम, रो. अनिल कुकडेजा, रो. नितीन गोपन, रो. जनार्दन दहिवाळ, रो. गणेश वाघ, रो. उमाकांत थोरात, रो.डॉ.प्रदीप आघाव, रो. प्रा. राजेंद्र गाडेकर, रो. बाबासाहेब कुडके, रो. डॉ. प्रवीण ढगे, रो.डॉ. धनराज वाघमारे, रो. बालाजी घरत, रो.अनिता शिंदे, रो. संगिता सपकाळ, रो.ॲड. नामदेव साबळे, शिक्षक पडुळे सर, दिपमाळ योग ग्रुप व रो. जितेंद्र बोरा यांचे विद्यार्थी व पालक अशा ६५ अजैन बांधवांनी निरंकार उपवास केले.

रोटरी क्लबने या उपवासाच्या माध्यमातून सर्वधर्म समभाव ही वृत्ती जोपासण्याचा संकल्प केला. यामध्ये हिंदू, शीख, ईसाई, जैन, मुस्लीम, बौद्ध, सिंधी, माहेश्वरी या सर्व धर्मांचा आदर करून या धर्मातील पवित्र गोष्टीचा, देश आणि समाजहित असणाऱ्या गोष्टीचा स्वीकार करण्याचा संकल्प सर्व रोटरीयननी केला.

## इकोफ्रेंडली श्रीगणेश मूर्ती कार्यशाळा जनशिक्षण संस्था बीड या ठिकाणी संपन्न.







गणेश चतुर्थी निमित्त रोटरी क्लब बीड मिडटाऊनतर्फे जनशिक्षण संस्था, बीड या ठिकाणी इकोफ्रेंडली श्री गणेश मूर्ती कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये कु. रजनी गाडेकर व प्रा. श्रीकांत पुरी सर यांनी शाडूच्या मातीपासून विद्यार्थ्यांना विविध गणेश मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये पहिली ते दहावी पर्यंच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहभाग घेऊन विविध प्रकारच्या शाडूच्या गणेश मूर्ती तयार करण्यात आल्या व सर्व विद्यार्थ्यांनी याच शाडूच्या गणेश मूर्ती घरी जाऊन स्थापन करण्याचा संकल्प केला व समाजामध्ये पिओपी पासून व केमिकलपासून कलर निर्मित गणेश मूर्ती न बसवण्याचा संकल्प केला. या पिओपी केमिकलयुक्त मुर्त्यांमुळे पाण्यामध्ये प्रदुषण वाढते व पर्यावरणाचा समतोल बिघडतो. हा संदेश गणेश चतुर्थी निमित्त समाजाला दिला. प्रोजेक्ट चेअरमन म्हणून रो.प्रा. राजेंद्र गाडेकर, रो. सौ. संगिता मनसबदार यांनी हा प्रोजेक्ट यशस्वी होण्यासाठी विशेष मेहनत घेतली. या प्रोजेक्टसाठी अध्यक्ष रो.इंजि. नितीन गोपन, सचिव रो. डॉ. निलेश जगदाळे व समस्त रोटरीयन उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी यांनी बहुसंख्येने उपस्थित होते तसेच या कार्यशाळेचा सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

### प्रोजेक्टस् क्षणचित्रे

* श्रीगणेश मूर्ती कार्यशाळा असल्यामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती.
* सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी विविध प्रकारच्या श्रीगणेश मूर्ती उत्कृष्टरित्या बनविल्या होत्या.
* शाडूच्या श्रीगणेश मूर्ती याच आम्ही घरी बसवणार असा सर्व विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याकडे आग्रह केला.
* कु.रजनी गाडेकर यांनी ही कार्यशाळा उत्कृष्टरित्या सादरीकरण केले.


Mathemagic
Explore world of Maths

MATHEMAGIC
By Dolly Jain


* CBSE, ICSE अभ्यासक्रम
* 3rd ते 5th सर्व विषय
* 6th ते 10th गणित
* होमवर्क व परीक्षांविषयी मार्गदर्शन

Follow our YouTube Channel
Mathemagic by Dolly Jain

* कोटा(राजस्थान) येथील नामांकित संस्थांमध्ये शिकवण्याचा अनुभव.
* गणिताचा पाया पक्का करण्यासाठी विशेष लक्ष.

Mob. 8380876963

# आदर्श गौरी, सुंदर गौरी सजावट स्पर्धा महिलांचा उत्स्फुर्त प्रतिसाद !





रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन तर्फे गौरी आगमनानिमित्त आदर्श गौरी सजावट स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये प्रत्येक महिलेने आपल्या घरात सजवलेली एक गौरीचा फोटो आणि व्हिडीओ क्लबला व्हॉट्सअपवर पाठवायचा होता. यामध्ये रोटरीच्या सर्व महिलांनी तसेच इतर महिलांनी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदवला. सहभागी महिलांना प्रमाणपत्र क्लबतर्फे देऊन गौरव करण्यात आला. प्रोजेक्ट चेअरमन म्हणून रो.डॉ. अनिता शिंदे यांनी हा प्रोजेक्ट यशस्वी होण्यासाठी उत्कृष्ठ नियोजन व व्यवस्थापन केले व प्रोजेक्ट यशस्वी झाला.

# प्रकृती, पर्यावरण एवं अपदा प्रबंधन अभियान निमित्त राजयोगी ब्रम्हकुमार मोहन सिंघल यांचे प्रबोधनपर व्याख्यान संपन्न





रोटरी परिवार व प्रजापिता ब्रम्हकुमार ईश्वरीय विश्व विद्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्ली येथील राजयोगी ब्रम्हकुमार मोहन सिंघल (अध्यक्ष, वैज्ञानिक व अभियंता विभाग, माऊंट आबू) यांचे पर्यावरण व प्रकृती याबाबत व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी बीड शहरातील प्रतिष्ठित व्यापारी, डॉक्टर, वकील, समाजसेवक, पत्रकार, पोलीस, उद्योजक असे अनेक मान्यवर उपस्थित होते. मोहन सिंघल यांनी भारत आणि जगामध्ये प्रकृती व पर्यावरण याचा कशाप्रकारे नाश होत आहे व त्याचा मानवी जीवनावर विपरीत परिणाम कसा होत आहे याचे विविध उदाहरणे देऊन श्रोत्याला मंत्रमुग्ध केले.

# रोटरीतर्फे आदर्श अभियंता पुरस्कार संपन्न




रोटरी व क्रेडाई यांच्यातर्फे इंजि. राहुल बोरा व आर्किटेक्ट अनिरुद्ध देशमुख यांना आदर्श अभियंता पुरस्कार देण्यात आला.

## रोटरी क्लबतर्फे सर्व मेंबर्सना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

रो. अनिल कुकडेजा– ४ ऑक्टो.
रो. गणेश मंत्री – १२ ऑक्टो.
रो. अनिता शिंदे – १५ ऑक्टो.
रो. गंगाबिशन करवा– १८ ऑक्टो.
रो. भारत शेटे – २८ ऑक्टो.
रो. चंद्रप्रकाश सेठी – ३१ ऑक्टो.

## रोटरी क्लबतर्फे सर्व ॲनेटस्‌ना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

आगम आदेश नहार–१ ऑक्टो.
तेजस राम व्हरकटे– १ ऑक्टो.
भाविक सुरेश बुद्धदेव– २ ऑक्टो.
प्रशांत माणिक परभणे– २ ऑक्टो.
अपूर्वा अभिषेक जाधव–५ ऑक्टो.
सिमा जनार्दन दहिवाळ– ९ ऑक्टो.
श्रुती संजय गुप्ता– १३ ऑक्टो.
शुभम भगिरथ चरखा– १९ ऑक्टो.
आदित्य गणेश वाघ– २० ऑक्टो.
धनश्री खनदाट– २७ ऑक्टो.

## रोटरी क्लबतर्फे सर्व रोटरीयन व ॲन्स यांना लग्न वाढदिवसाच्या शुभेच्छा!

महेक जयप्रकाश काविन्ना–३० ऑक्टो.
रजनी राजेंद्र गाडेकर– ३१ ऑक्टो.

## रोटरी क्लबतर्फे सर्व ॲन्स यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

सौ.सोनल नहार – ८ ऑक्टो.
सौ.जया काविन्ना–८ ऑक्टो.
डॉ.सौ.स्नेहा आळणे–१८ ऑ.
सौ.मिनाक्षी शेटे–२८ ऑक्टो.
तबस्सुम बेगम– ३० ऑक्टो.



**रो.सुर्यकांत महाजन** यांची महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा, बीड जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल रोटरी परिवारातर्फे शुभेच्छा..!



**पद्मश्री डॉ.रत्नप्पा कुंभार** यांच्या ११५ व्या जयंतीनिमित्त रो.इंजि.हर्षल केकान यांना लोकरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल रोटरी परिवारातर्फे शुभेच्छा..!



**रो.डॉ. प्रकाश कोंका** यांना महाराष्ट्र पद्मशाली युवक संघटना यांच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल रोटरी परिवारातर्फे शुभेच्छा..!

स्टॉकिस्ट अॅन्ड डिलर्स
*कारपेट *मॅटींग
*फोम *कुशन *क्वायर
*रेडीमेड पडदे
*रेक्झीन *बेड शिट्स
*गादी *वेलवेट
*फर्निशिंग *वॉलपेपर

सजावट
25
गृह सजावटीचे भव्य दालन
मुनोत कॉम्प्लेक्स, पुना गाडगीळच्या खाली,
सुभाष रोड, बीड – ४३१ १२२

रौप्य महोत्सवी वर्षात यशस्वी पदार्पण...
चंद्रप्रकाश सेठी
मो. 7588 85 85 85
9511 809 409